31/3/06

HDFC BANK HDFC BANK LTD.

5001/-

PART III
For the Customer
ACKNOWLEDGEMENT

Serial No. : 36675

86620

Received From : Dosti Enterprises

Franking Amount : 5001/-

Charges : .....

Total : 5001/-

Vide P/O No. / Cash / Transfer Cheque 169515

Drawn on HDFC Bank

or Cash towards franking of document

Signature / Stamps of Bank

Signature of Customer :
I confirm that I have checked the value franked and the bank is not liable for anything related to the document.

H.D.F.C. Bank Legal
Department, Kamala Mills Compound,
Lower Parel, Mumbai-400013.
D-5/STP/FC.R.1910/03/2004/2042-44

// श्री //

कधीही रद्द न होणारे कुलमुखत्यारपत्र

आज दिनांक 25 माहे ~~मार्च~~ एप्रिल सन २००६ रोजी ठाणे येथे.

मेसर्स. दोस्ती एन्टरप्रायझेस, भागीदारी संस्था)
तर्फे भागीदार - श्री. दिपक के. गोराडीया)
श्री. राजूल वी. वोरा)
मेसर्स दोस्ती लॅन्ड डेव्हलपर्स प्रा. लि.)
नोंदणीकृत पत्ता :)
लॉरेन्स ॲन्ड मेयो हाऊस, पहिला मजला .)
२७६, डॉ. डी. एन्. रोड,)
मुंबई - ४०० ००१.)

पहिले पक्ष
कुलमुखत्यारपत्र
लिहून घेणार

यांस ...

D. B. Patil

Hemant

भारत 86620 164496 Special Adhesive MAR 31 2006 महाराष्ट्र
₹5000/- PB5135 STAMP DUTY MAHARASHTRA 12:45

१. श्री.धर्मा बारक्या पाटील]
वय ८५ वर्ष व्यवसाय शेती व व्यापार]
२. श्री.माणिक धर्मा पाटील]
वय ६१,. व्यवसाय शेती व व्यापार]
३. श्रीमती यशोधा माणिक पाटील]
वय ५५,. व्यवसाय शेती व गृहिणी]
४. श्री.भानुदास माणिक पाटील]
वय ३०,. व्यवसाय शेती व व्यापार]
५. श्री.दिनेश माणिक पाटील]
वय २५,. व्यवसाय शेती व व्यापार]
६. सौ.अंजली सुरेश पाटील]
वय सज्ञान व्यवसाय शेती व गृहिणी]
सर्व राहणार मौजे बाळकुम, तालुका व जिल्हा ठाणे]
७. सौ.हेमा सुनिल पाटील] लिहुन देणार
वय सज्ञान व्यवसाय शेती व गृहिणी] जमीन मालक
राहणार मौजे मुंब्रा, तालुका व जिल्हा ठाणे] दुसरे पक्षीय
८. सौ.जया राम भगत]
वय सज्ञान व्यवसाय शेती व गृहिणी]
राहणार मौजे भिवंडी, तालुका व जिल्हा ठाणे]
९. श्री.तुलसिराम धर्मा पाटील]
वय ४७, व्यवसाय शेती व व्यापार]
१०. श्रीमती जयवंती तुलसिराम पाटील]
वय ४३,.व्यवसाय शेती व गृहिणी]
११. कुमारी किर्ती तुलसिराम पाटील]
वय १९,.व्यवसाय शेती व गृहिणी]
१२. कुमार निखिल तुलसिराम पाटील]
वय १४,.व्यवसाय शिक्षण [अज्ञान]]
१३. श्री.अर्जुन धर्मा पाटील]
वय ४१ ,. व्यवसाय शेती व व्यापार]
१४. श्रीमती वनीता अर्जुन पाटील]
वय ३५,.व्यवसाय शेती व गृहिणी]
१५. कुमार भावेश अर्जुन पाटील [अज्ञान]]
वय १५ ,. व्यवसाय शिक्षण]
१६. ~~श्रीमती चंद्राबाई रामचंद्र पाटील~~]
वय ६५,.व्यवसाय शेती व गृहिणी]
१७. श्रीमती कुसूम बाळाराम पाटील]
वय ६०,.व्यवसाय शेती व गृहिणी]



D.B.Patil
Hemant

१८. ~~श्रीमती संभुबाई मोतीराम पाटील~~]
वय ७२,,व्यवसाय शेती व गृहिणी]
१९. श्री.सदानंद मोतीराम पाटील]
वय ४९,,व्यवसाय शेती व व्यापार]
२०. श्रीमती रजनी सदानंद पाटील]
वय सज्ञान व्यवसाय शेती व गृहिणी]
२१. कुमारी तृप्ती सदानंद पाटील]
वय[अज्ञान],,व्यवसाय शिक्षण]
२२. श्री.प्रकाश मोतीराम पाटील]
वय ४५,,व्यवसाय शेती व व्यापार]
२३. श्रीमती संध्या प्रकाश पाटील]
वय सज्ञान व्यवसाय शेती व गृहिणी]
२४. कुमारी साहिली प्रकाश पाटील]
वय[अज्ञान],,व्यवसाय शिक्षण]
२५. कुमार आदित्य प्रकाश पाटील]
वय[अज्ञान],,व्यवसाय शिक्षण]
२६. सौ.हर्शला नारायण म्हात्रे]
वय ५१ व्यवसाय शेती व गृहिणी]
राहणार मौजे भांडूप मुंबई]
२७. श्रीमती यमुनाबाई कृष्णा पाटील]
वय ६०, व्यवसाय शेती व गृहिणी]
२८. श्री.रमाकांत कृष्णा पाटील]
वय ३८,,व्यवसाय शेती व व्यापार]
२९. श्री.दिपक कृष्णा पाटील]
वय ३६,,व्यवसाय शेती व व्यापार]
३०. श्री.धर्मेंद्र कृष्णा पाटील]
वय ३४,,व्यवसाय शेती व व्यापार]
३१. सौ.कामिनी वसंत म्हात्रे]
वय ३२, व्यवसाय शेती व गृहिणी]
राहणार मौजे कोपरी , तालुका व जिल्हा ठाणे]
३२. ~~श्रीमती यशवंती प्रभाकर पाटील~~]
वय ५५,व्यवसाय शेती व गृहिणी]
३३. श्री.भागेश प्रभाकर पाटील]
वय ३२,,व्यवसाय शेती व व्यापार]
३४. श्री.संतोष प्रभाकर पाटील]
वय ३०,,व्यवसाय शेती व व्यापार]
३५. श्री.हेमंत प्रभाकर पाटील]
वय २८,,व्यवसाय शेती व व्यापार]

D. B. Patil

Hemant

३६. सौ.आशा लालचंद भाईर]
वय २५, व्यवसाय शेती व गृहिणी]
राहणार मौजे घंसौली, नवी मुंबई]
३७. सौ.शकुंतला गजानन पाटील]
वय ५५, व्यवसाय शेती व गृहिणी]
राहणार मौजे कळवा, तालुका व जिल्हा ठाणे]
३८. श्री. हरेश गजानन पाटील]
वय २८,व्यवसाय शेती व व्यापार]
३९. सौ.भारती वसंत पाटील]
वय ३५, व्यवसाय शेती व गृहिणी]
राहणार मौजे वसई , तालुका व जिल्हा ठाणे]
]
नंबर ९ ते २५, २७ते ३0 व ३२ ते ३५ राहणार मौजे बाळकुम,]
तालुका व जिल्हा ठाणे.]

ज्याअथी मौजे बाळकुम, तालुका व जिल्हा ठाणे येथिल खालिल वर्णन केलेली जमीन मिळकत लिहुन देणार यांच्या वडिलोपार्जित मालकी हक्काची व प्रत्यक्ष कब्जेवहिवाटिची निर्वेध बोजाविरहित असा मिळकती आहेत, कि ज्या मिळकतीचा उल्लेख व चतुःसिमा खालील प्रमाणे

सर्वे नं.		हिस्सा	क्षेत्र	आकार
जुना	नविन	क.	हे- आ -चौ	रू.पै.
१५	१४	३	0- 0६-१	१.१९
१८	१७	९	0-१३ -९	२.६९
१९	१८	१0	0-0३ -३	0.६३
२६	२९	२	0-३१ -१	३.५७
३७	४0	१२	0-0४ -५	0.९८
३५	३८	३अ	0-0७ -३	0.७२
४६	४९	२	0-0८ -८	१.५0
४६	४९	३	0-0९ -९	१.७५
४९/४/	५४	३	0-00 -८	0.१७
			0-८५-७	

D. B. Patil

म्हणजे ८५७० चौरस मिटर्स म्हणजे सुमारे १०३७० चौरस वार शेत जमीन तद्दअंगभूत सर्व हक्क हितसंबंध व सर्व ऋण बोजेमुक्त अशी मिळकत आहे व सदरची मिळकत सोईसाठी एकत्रितरित्या विस्तृतपणे हया करारासोबत जोडलेल्या नकाशामध्ये लाल रंगाने अधोरेखित केलेली आहे.

(यापढे वर नमुद केलेल्या जमिनीचा सोईसाठी एकत्रितरित्या "सदरची मिळकत" असा उल्लेख करून दर्शविलेली आहे.)

आणि ज्याअर्थी सदरहू मिळकत लिहुन देणार यांचे प्रत्यक्ष कब्जात व वहिवाटीस गेली अनेक वर्षे ताब्यात असून सदरहू मिळकतीमधून लिहुन देणार हे उत्पन्न घेत आहेत. सदरची मिळकत लिहुन देणार यांचेशिवाय अन्य कोणचाही कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध नाही. सदरची मिळकत त्याच्या मालकी हक्काची मिळकत असल्याने त्यांनी ती मिळकत विकसित करण्याचे योजिले होते. परंन्तु लिहून देणार यांस बांधकाम क्षेत्रातील योग्य अनुभव नसल्याने त्यांनी सदरहू मिळकतीचे विकासाचे हक्क योग्य त्या बांधकाम व्यावसाईकास देण्याचे ठरविले.

आणि ज्याअर्थी लिहुन देणार यांस सदर मिळकतीपासून कुटूंबास काही उत्पन्न मिळत नसल्याने तसेच कुटूंबातील सदस्यांच्या कायदेशीर गरजा भागविण्यासाठी पैशाची गरज निर्माण झाली. तसेच वाढत्या शहरीकरणामुळे सदर जागेत अतिक्रमण होण्याची शक्यता होती. त्यामुळे सदर जमिनीची नागरी प्रयोजनासाठी डेव्हलेपमेंट करणे शक्य झालेले आहे.

आणि ज्याअर्थी सदरहू मिळकतीमध्ये शेतीउत्पन्न घेणे अशक्य होऊ लागल्याने लिहुन देणार यांना त्यांच्या आर्थिक अडचणी व कौटुंबिक गरजा भागविण्याचे दृष्टीने सदरहू मिळकतीचा बिनशेती वापर करून मिळकतीचा विकास करून त्यावर इमारती बांधण्याचे योजले होते. परंतु सदरहू मिळकत विकसित करणे व बांधकाम क्षेत्रातील योग्य अनुभव नसल्याने व त्यांचेकडे पुरेसे आर्थिक पाठबळ नसल्याने त्यांनी सदरहू मिळकतीचे विकासाचे हक्क दिनांक रोजीच्या डेव्हलपमेंट करारानुसार

D. B. Kute

मेसर्स दोस्ती एन्टरप्रायझेस्, भागीदारी संस्था, कार्यालय ः लॉरेंस ॲन्ड मेयो हाऊस्, डॉ.डी.एन.रोड, मुंबई, तर्फे भागीदार १.श्री.दिपक के.गोराडीया, २.श्री.राजुल वी वोरा (हयापुढे "सदर डेव्हलपर्स" असा उल्लेख केला आहे.) ह्यांस सदर करारात नमूद केलेल्या मोबदल्यापोटी व अटी व शर्तीसापेक्ष डेव्हलप करण्यास दिलेली आहे. सदर कराराचे तरतुदींनुसार आम्हांस सदर डेव्हलपर्स यांचे नावे अलाहिदा मुखत्यारपत्र लिहुन देणे आवश्यक आहे.

सबब आम्ही मुखत्यारपत्र लिहुन देणार या कुळमुखत्यारपत्रानुसार सदर डेव्हलपर्स मेसर्स दोस्ती एन्टरप्रायझेस्, भागीदारी संस्था, कार्यालय ः लॉरेंस ॲन्ड मेयो हाऊस्, डॉ.डी.एन.रोड, मुंबई, तर्फे भागीदार १.श्री.दिपक के.गोराडीया, २.श्री.राजुल वी वोरा, ३.मेसर्स दोस्ती लॅण्ड डेव्हलर्पस् प्रायव्हेट लि. (हयापुढे "सदर कुलमुखत्यारी" असा उल्लेख केला आहे.) यांस आमचे कायमचे कुलमुखत्यारी नेमून त्यांस वर नमुद केलेल्या मिळकती संदर्भात आमचे नावे व वतीने खालील कामे करण्याचे अधिकार देत असून सदर अधिकारांची अंमलबजावणी सदर तिघांनी एकत्र मिळुन आणि/अथवा कोणाही एकाचे सहीने करावयाची आहे.

१. सदर मिळकतीबाबतची कागदपत्रे मिळवण्यासाठी तलाठी, मंडळ निरिक्षक, मेहेरबान तहसिलदार, मेहेरबान जिल्हाधिकारी यांचेकडे अथवा जरूर त्या सरकारी अधिका-यांकडे अर्ज करणे, आवश्यक ती कागदपत्रे मिळवणे, मिळकतीची मोजणी करून घेणेसाठी मेहेरबान जिल्हा निरिक्षक भूमिअभिलेख डी.आय.एल.आर., वन विभाग, पर्यावरण निर्यत्रण विभाग, यांचेकडे अथवा जरूर त्या सर्व अधिका-यांकडे अर्ज करणे, सदर अर्जावर आमचे वतीने सह्या करणे व लागणारी फी भरणे, जमिनीची मोजणी करून घेऊन जमिनीच्या हद्दी निश्चित करून मिळकतीस कंपाऊंड घालणे.

२. सदरहू मिळकतीचा जिल्हा निरिक्षक भुमिअभिलेख आणि/अथवा एकत्रिकरण अधिकारी यांचेकडून सर्व्हे करून मिळकतीच्या हद्दी स्वतः अगर त्यांचे नॉमीनीज कडून, अगर त्यांचे मजूरांकडून निश्चित करून घेणे, त्यांचे मर्जीनुसार सदर मिळकतीचे

D.B.Patil

शेजारील मिळकतींबरोबर एकत्रिकरण, जमिनीच्या सिमारेषेंची फेरमोजणी आणि अथवा सदर जमिनीचे भाग पाडणे आणि /अथवा अन्य योग्य ती जमिनीच्या उत्तम विकासासाठी कृत्ये करून मिळकतीचे लेआऊट व बांधकाम नकाशे मंजूर करून घ्यावेत, त्यासाठी डिस्ट्रीक्ट इन्सपेक्टर ऑफ लॅंड रेकॉर्डस, एकत्रिकरण अधिकारी यांच्याकडे आणि इतर सर्व संबंधीत खात्यांकडे अर्ज करणे, चलन भरणे, सर्व्हे फी भरणे, सर्व्हे करीता जागेवर हजर राहून जमिनीच्या हद्दी दाखविणे, त्याकामी जाबजबाब देणे, व त्यांना इतर आवश्यक ते सर्व सहकार्य देणे, त्यांचेकडून मोजणी नकाशे, गट उतारे, व इतर रेकॉर्डस घेणे, त्यांत दुरूस्त्या करून घेणे, वगैरे .

३ . जमिनीचे ७/१२ चे उतारे, खाते उतारे, फेरफार गटबुक, स्केच, मोजणी नकाशे, इत्यादी सर्व कागदपत्रे संबंधीत तलाठी, सर्कल इन्स्पेक्टर, तहसिलदार, उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी, डिस्ट्रीक्ट इन्स्पेक्टर ऑफ लॅंड रेकॉडस, इत्यादीकडून घेणे, त्यासाठी आवश्यक ते अर्ज, प्रतिज्ञापत्रे निवेदने देणे, जाबजबाब देणे, आवश्यक ती फी भरणे, वगैरे तदअनुषंगिक सर्व कामे करणे .

४ . सदर म्ळिकतीवरील जमिनीत भराव टाकून जमिनीची लेवल करणे, रस्ते, नाले तयार करणे, तसेच जमिनीमधून माती काढून घेऊन त्याचा वापर करणे अथवा विक्री व्यवहार करणे .

५ . महाराष्ट्र जमीन महसूल कायदा, १९६६, महाराष्ट्र रिजनल ॲंड टाऊन प्लॅनींग ॲंट, १९६६, नागरी जमीन [कमाल मर्यादा व विनिमय] कायदा, १९७६, तसेच अन्य सर्व संबंधीत कायद्यांनुसार भारत सरकारची सर्व खाती व अधिकारी, महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र शासनाची सर्व खाती व अधिकारी, भारत सरकार आणि महाराष्ट्र सरकार यांनी स्थापन केलेली सर्व महामंडळे, सार्वजनिक संस्था, जिल्हा परिषद, सेटलमेंट कमिशनर, विभागीय आयुक्त कोकण विभाग, एकत्रिकरण अधिकारी, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, डेप्युटी डायरेक्टर टाऊन प्लॅनिंग, टाऊन प्लॅनिंग ऑफिसर, महानगर पालिका व म्युनिसिपल कमिशनर, अग्नि शामक दल, वन विभाग, पर्यावरण नियंत्रण विभाग, इत्यादी व अन्य सर्व संबंधीत कार्यालयांकडून व

D. B. Patil

अधिका-यांकडून आवश्यक परवानग्या, आदेश व हुकूमनामे मिळवणे त्यासाठी त्यांच्याकडे अर्ज करणे, जाबजबाब देणे, साक्षीपुरावे देणे, शपथेवर प्रतिज्ञापत्र करणे, नकाशे, ले आऊट वगैरे सर्व आवश्यक कागदपत्रे तयार करून दाखल करणे अथवा मंजूर करून घेणे, नजराणा भरणे, टॅक्स भरणे व इतर आवश्यक व सर्व पुरक कामे करणे, सदरहू परवानग्या मिळविल्यानंतर त्यांच्या अटींची व सर्व तरतुदींची पुर्तता करणे व त्या अनुषंगाने करावी लागणारी इतर सर्व कामे करणे.

६. सदरहू मिळकतीचे डेव्हलपमेंटकामी महाराष्ट्र जमीन महसूल कायदा, १९६६ व अन्य कायद्यानुसार आवश्यक परवानग्या मिळविणे सदर परवानग्यांची सुधारणा अथवा बदल करून घेणे, जमिन एन.ए करून घेणे, नागरी जमीन [कमाल मर्यादा व विनिमय] कायद्याखाली परवानगी मिळविणे, सदर मिळकत रिटेनेबल करून घेणे व अन्य परवानग्या व ना हरकत दाखले मिळविणे व त्यासाठी केंद्र सरकार, महाराष्ट्र शासन, कलेक्टर, तहसिलदार, व महसुल अधिकारी त्यांतील सर्व खाती, टाऊन प्लॅनिंग ॲथॉरिटी, सर्व्हे अधिकारी, अर्बन लॅड सिलींग ॲथॉरिटी, महापालिका, पोलिस खाते व तत्सम सर्व शासकीय व निमशासकीय व स्वायत्त संस्था, कार्यालये, सक्षम अधिकारी, प्राधिकारी, यांचेशी आमचे वतीने पत्रव्यवहार करणे, अर्ज विनंत्या करणे, करारमदार करणे, अंडरटेकींग देणे, जाबजबाब देणे, व सामान्यतः सदर मिळकतीचे मालकीहक्क, डेव्हलपमेंटकामी आवश्यक असणारी सर्व प्रकारची कामे करणे.

७. सदर मौजे बाळकूम गावांस नागरी जमीन [कमाल मर्यादा व विनिमय] कायदा, १९७६ लागु आहे. सदर कायद्यातील कलम "६[१]" अन्वये सदर मिळकतीच्या संदर्भात विवरणपत्र दाखल करणे आवश्यक आहे ते विवरणपत्र आमचे वतीने दाखल करून आमचे कुळमुखत्यारी म्हणून सह्या करणे, वा दाखल विवरण पत्रात योग्य बदल करणे, विवरण पत्राच्या कामी कागदपत्र दाखल करणे जबाब देणे व सदर कायद्याच्या कलम ८[४] अन्वये सक्षम प्राधिकारी व नागरी संकुलन यांचेकडून हुकूम घेणे, सदर हुकूम मान्य करणे, अथवा वरिष्ठ कोर्टात अपिल दाखल करणे, तसेच सदर कायद्याप्रमाणे जमीन अतिरिक्त घोषित झाल्यास सदर मिळकत

D.B.Patil

विकसित करण्यास नागरी जमीन कायद्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाकडून परवानगी मिळवणे व मिळकत विकसित करून बिनशेतीसाठी वापरणे.

८. ठाणे महानगरपालिका, ठाणे, तहसिलदार ठाणे, जिल्हाधिकारी ठाणे, व त्यांचेशी संबंधीत खाती यांचेशी पत्रव्यवहार करणे, विविध खात्यांशी संपर्क साधणे व वास्तु विशारद नेमुन त्यांचे मार्फत सदर मिळकतीचे अमालगमेशन, सब डिव्हीजन व डेव्हलपमेंटचे नकाशे तयार करून घेणे, त्यावर आमचे नावे व आमचे वतीने सह्या करणे आणि विशेषतः ।

अ. नकाशे मजूर करून घेणेसाठी अर्ज करणे, त्यांस मंजूरी मिळविणे, मिळालेल्या मंजूरीची विधीग्राह्यता वाढवून घेणे आणि आमचे मुखत्यारी यांच्या मर्जीनुसार त्या नकाशात बदल अगर दुरूस्त्या करवून घेणे,

ब. ऑक्युपेशन दाखल्यासाठी अर्ज करणे व ते मिळविणे,

क. संबंधीत कर निर्धारण खात्यांशी पत्रव्यवहार करणे किंवा संपर्क साधुन सदर मिळकतीवरील बांधकामाबाबत कर निर्धारण्याच्या बाबतीत अर्ज करणे व सदर मिळकतीस कर लावून घेणे,

ड. सदर मिळकतीचे विकासाचेकामी आवश्यकतेनुसार ना हरकत दाखला मिळविणे,

इ. पाण्याच्या नळाची जोडणीसाठी संबंधीत खात्यांशी पत्रव्यवहार करणे, अर्ज करणे, करारमदार करणे,

ई. सक्षम अधिकारी वा ॲथॉरिटी यांचे कडे भरावयाच्या अगर भरलेल्या अनामत रकमांचा परताना मागणे व मिळाल्याची पावती देणे,

फ. एकंदर विकासाचेकामी लागणारे सर्व परवाने मिळविणे व सर्व कामे करणे.

९. आमचे नावे व आमचे वतीने आवश्यकतेनुसार सदर मिळकतीचे विकासनाचे कामी महाराष्ट्र राज्य आणि अथवा अन्य कायद्याच्या विविध तरतुदीनुसार नियुक्त

D. B. patil

केलेले सक्षम अधिकारी व अन्य अधिकारी यांचेकडे विविध परवानग्या मागणे, त्यांस मूजुरी घेणे व त्या प्रयोजनासाठी डिक्लरेशन लिहून देणे, फॉर्म भरून स्वाक्षरी करणे, शिवाय कायद्यानुसार नियुक्त केलेल्या कोणत्याही अधिका-यांसमोर आमची बाजू मांडणे, जाबजबाब देणे, जमीन हस्तांतरणाची परवानगी मिळविणे अर्बन लॅंड सिलींग कायद्याखालील कराव्या लागणा-या सर्व गोष्टी व कामे आमचे वतीने कुळमूखत्यारी यांचे मर्जीनुसार करणे.

१०. आरक्षणाखालील भुखंडाचा टी.डी.आर. मिळणेकामी महानगरपालिकेच्या सर्व अटी व शर्तीची पूर्तता करणे, त्या कामी अर्ज देणे, जमिनीची मोजणी करणे, वेगवेगळ्या परवानग्या महानगरपालिकेस सादर करणे, आरक्षणाखालील भूखंडाचा महानगरपालिकेस ताबा देणे, ताबा पावती लिहून देणे, तसेच सदर भूखंड महानगर पालिकेस हस्तांतरीत करण्यासाठी आवश्यक ती सर्व कामे करणे, आरक्षणाखालील भूखंडाचा टी.डी.आर. मिळविणे कामी आवश्यक ते नोंदणीकृत अथवा अनोंदणीकृत दस्तावेज करणे, ते नोंदणीकृत करणे, त्यानुसार ७/१२ उता-यावर 'कब्जेदार सदरी' महानगर पालिकेचे नावे दाखल करणे, डिक्लरेशन अंडरटेकिंग देणे, महानगर पालिकेकडून डेव्हलेपमेंट राईटस् सर्टिफिकेट (डी.आर.सी.) मिळविणे व एकंदर सदर मिळकतीचा टी.डी.आर. व डी.आर.सी. मिळविणे कामी आवश्यक ती सर्व कामे करणे.

११. पहिले पक्षीय यांस यापुढे त्यांचे मर्जीनुसार सदर मिळकतीची विभागणी करणे आणि किंवा शेजारील मिळकती बरोबर एकत्रिकरण करणे, रिझर्व्हेशन रद्द करणे, जमिनीच्या सिमारेषांची फेरतपासणी करणे, रिझर्व्हेशन दुस-या मिळकतीत किंवा मिळकतीच्या दुस-या भागात हलवणे, इतर मिळकतीचा टी.डी.आर. सदर मिळकतीवर घेणे, सदर मिळकतीचा टी.डी.आर. घेणे, टी.डी.आर. विकत घेण्यासाठी व विकण्यासाठी करारमदार करणे, अशा करारमदारांवर दुसरे पक्षीय यांचे वतीने सह्या करणे, ट्रान्सफर फॉर्म व युटिलिजेशन फॉर्म यांचेवर सह्या करणे, असा टी.डी.आर. सदर अथवा अन्य मिळकतीवर वापरून सुधारीत बांधकाम नकाशे

D. B. patil

तयार करून घेणे , त्यावर दुसरे पक्षीय यांचे वतीने सह्या करणे, असे बांधकाम नकाशे मंजूरीकामी लागणारी डिक्लरेशन, अंडरटेकिंग वगैरे देणे व नकाशे मंजूर करून घेणे, अथवा करण्याचे सर्वाधिकार त्यांस प्राप्त झालेले आहेत. सबब या करारावर सही केल्यापासून सदरहू मिळकत व त्यावर टी.डी.आर. विकण्यासाठी करारमदार करणे, पैसे घेणे व त्याचा उपभोग घेण्याचे सर्वाधिकार पहिले पक्षीय यांस प्राप्त झालेले आहेत.

१२. सरदहू मिळकत फायदेशीररित्या विकसित करण्यासाठी जर आजुबाजूच्या मिळकती एकत्र करून सरदहू मिळकतीचा एकत्रितरित्या विकास करणे कामी लागणारी कागदपत्रे दस्ताऐवज वगैरे आमचे नावे व आमचे वतीने करणे. तसेच सदरहू मिळकतीत मिळणारा एफ.एस.आय.त्यांचे मर्जीप्रामाणे इतर कुठल्याही मिळकतीवर वापरणे व सदर मिळकतीपासून मिळणा-या एफ.एस.आय. व्यतिरिक्त इतर एफ.एस.आय सदरहू मिळकत विकसित करण्यासाठी वापरणे.

१३. नविन विकसित नियमाप्रमाणे तसेच नविन विकसित अधिकार हस्तांतर टी.डी.आर करण्यात येणा-या योजने खाली त्यातून मिळणा-या फायदयाचा उपभोग घेणे. जर ठाणे महानगर पालिकेने सदरहू मिळकतीतील कुठलाही भाग हा डेव्हलपमेंट राईटस ट्रान्स्फर करण्याच्या योजने खाली ताब्यात घेतल्यास त्याच्या बदल्यात मिळणा-या डेव्हलपमेंट राईटस स्विकारणे व त्याचा वापर करणे.

१४. सध्याच्या विकास नियमाप्रमाणे तसेच इतर कोणत्याही नियमाप्रमाणे वा कायद्याप्रमाणे जर अधिक एफ.एस.आय. सदरहू मिळकतीमध्ये वापरण्यासाठी ठाणे महानगरपालिकेकडून मिळणार असल्यास तो अधिक एफ.एस.आय. सदरहू मिळकत विकसित करण्यासाठी वापरणे.

१५. जमिनीसंबंधाने वा त्यामधील बांधकामे इत्यादीबाबत कोणत्याही सरकारी, निम सरकारी, कार्यालये अधिकारी वगैरे अन्य कोणत्याही संस्थेकडून ॲक्विझिशनची, रिक्विझिशनची, खाते आकारणेची दंडाची, खालसा करणेची, वा अन्य कोणतीही कारवाई सुरू झाल्यास त्याकामी सर्व संबंधितांपुढे हजर राहणे, अर्ज करणे, जाबजबाब

D. B. Patil

देणे, साक्षीपुरावे देणे, कागदपत्रके दाखल करणे, व अन्य आवश्यक त्य कृतीकरणे, व जमीन ॲक्विझिशन वा रिक्वीझिशन व खालसा क्षेत्रातुन वगळून घेणे.

१६. सदर जमिनीचा वापर बिनशेती उपयोगासाठी करण्याचा झाल्यास टाउन प्लॅनिंग कायद्याप्रमाणे आरक्षण लादल्यास त्याबाबत योग्य ती कायदेशीर कामे करून आरक्षण काढून घेणे.

१७. सदर मिळकत विकसित करून घेण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था पालिका यांचे कार्यालयात अथवा त्या अधिका-यांकडून सदर मिळकतीवर नियोजित इमारतीचा आराखडा मंजूर करून घेणे, मंजूर झालेला आराखडा मुदतीनंतर नुतनीकरण करून घेणे, आवश्यक वाटल्यास आराखडयात जरूर ती दुरूस्ती करणे, पुरवणी आराखडे मंजूर करून घेणे, त्यासाठी येणारी फी ची रक्कम भरणे व जरूर त्या सक्षम अधिका-यांपुढे आमचे वतीने हजर राहून कायदेशीर बाबींची पूर्तता करणे.

१८. सदरहु मिळकत अथवा मिळकतीचा कोणताही भाग तुकडा योग्य वाटेल त्या इसमांस विकत देणे अथवा विकसित करण्यासाठी देणे अशाप्रकारचे विकी व्यवहारा करतेवेळीस आमचे मुखत्यारी ह्यांस मुळ मालकाच्या वेगळया परवानगीची गरज लागणार नाही, या बाबत सर्व दस्त करून देणे, सदर दस्तांवर आपचे तर्फ आमचे कुळमुखत्यारी म्हणून दुय्यम निबंधक ह्यांचे समोर राहून दस्ताची पूतता करून देणे व नोंदणी कायद्याप्रमाणे मे.दुय्यम निबंधक, ठाणे ह्यांचे कार्यालयात नोंदणी करणेचे अधिकार आम्ही आमचे कुळमुखत्यारी ह्यांस दिले आहेत.

१९. सदर जमीन कोणत्याही शासकीय अथवा निम शासकीय संस्थेकडून स्थानिक स्वराज्य संस्थेकडून भूसंपादनात समाविष्ट केल्यास अगर नगरपालिकेने कोणत्याही सार्वजनिक उपयोगासाठी सदर मिळकतीवर आरक्षन लादल्यास सदर मिळकत मुक्त करून घेण्यासाठी आमचे वतीने अर्ज, अपिल दाखल करणे व सदर कायदेशीर बाबींची पूर्तता करणे.

२०. यापुढे पहिले पक्षीय यांनी स्वतः आणि अथवा त्यांचे नॉमिनीज अथवा असायनीज यांनी विकासचे कामी विविध व आवश्यक त्या सर्व प्रकारच्या परवानग्या

D. B. Patil

सर्व संबंधीत अधिका-यांकडून व कार्यालयांकडून मिळवून पहिले पक्षीय यांचे मर्जी नुसार सदर मिळकतीचे शेजारील मिळकतींबरोबर एकत्रिकरण जमिनीच्या सिमारेषेंची फेरमोजणी आणि अथवा सदर जमिनीचे भाग पाडणे आणि /अथवा अन्य योग्य ती जमिनीच्या उत्तम विकासासाठी कृत्ये करून मिळकतीचे लेआऊट व बांधकाम नकाशे मंजूर करून घ्यावेत व त्यानुसार सदर मिळकतीवर बांधकाम करावे व त्यातील फ्लॅटस् व प्रिमायसेस त्रयस्थास विकणे व असा खरेदीदांची महाराष्ट्र को ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट, १९६० खाली एक सोसायटी अथवा अनेक सोसायटया अथवा महाराष्ट्र अपार्टमेंट ओनरशिप ॲक्ट, १९७० खाली अपार्टमेंट धारकांची एक असोसिएशन अथवा अनेक असोसिएशन अथवा कंपनीज ॲक्ट, १९५६ खाली एक कंपनी अथवा अनेक कंपन्या स्थापन कराव्यात.

२१. वर नमूद प्रमाणे मोबदला दुसरे पक्षीय यांनी पहिले पक्षीय यांचेकडून स्विकारला असल्याचे लिहुन देणार हयांनी लिहुन घेणार अथवा त्यांचे नॉमीनीज वा असायनी यांस सदरहू मिळकतीचा प्रत्यक्ष खुला व निर्विवाद, ताबा, कब्जा आज रोजी या करारावर सही करतेवेळी साक्षीदारांसमक्ष दिलेला आहे. तसेच उभय पक्षीयांमध्ये ठरले आहे की या करारासोबत पहिले पक्षीय हे दुसरे पक्षीय यांच्या सांगण्यावरून पहिले पक्षीय यांनी सदरहू मिळकतीत बोर्ड लावणे, कुंपण घालणे, भरणी करणे, झाडे लावणे, मोजणी करून घेणे, वगैरे कामे करण्यास दुसरे पक्षीय यांची हरकत नाही. सबब या करारावर सही केल्यापासून सदरहू मिळकत बांधकाम करणे, विकसित करणे, तयार होणा-या इमारतीतील, फ्लॅट, गाळे, इतरांस विकणे, करारमदार करणे, पैसे घेणे व त्याचा उपभोग घेण्याचे सर्वाधिकार पहिले पक्षीय यांस प्राप्त झालेले आहेत.

२२. सदरहू मिळकतीचे संरक्षण डेव्हलपमेंट करणे व सदरहू मिळकतीवर बांधण्यात येणा-या इमारतींमधील फ्लॅट व प्रिमायसेस विकणे सदर जमिनीच्या विकिसाठी गि-हाईक शोधणे, त्या गि-हाईकांबरोबर जमीन विकिबाबत बोलणी करणे, बयाणाची रक्कम स्विकारणे, साठेकरार अथवा जमीनीचे कायम खरेदीखत करून देणे, अथवा योग्य तो

D.B. Patil

दस्त करून देणे, जमिनीच्या विकी व्यवहारापोटी मिळणारा मोबदला रक्कम स्विकारणे, विकि व्यवहारा बाबत सर्व दस्त करून देणे,सदर दस्तांवर आमचे तर्फ आमचे कुळमुखत्यारी म्हणून दुय्यम निबंधक ह्यांचे समोर राहून दस्ताची पूतता करून देणे व नोंदणी कायद्याप्रमाणे नोंदणी करणे.

२३. जमिनीच्या विकी व्यवहारापोटी तसेच अन्य मोबदल्याची रक्कम स्विकारल्यानंतर आयकर कलम २३0अ अन्वये प्रमाणपत्र मिळवणे, त्यासाठी आमचे वतीने रिटर्न भरणे, व आम्ही जी कायदेशीर कामे करणे आवश्यक आहे ती सर्व कामे करणे.

२४. सदर जमिनीवर बांधकामांना विज कनेक्शन घेणेसाठी आवश्यक त्या सर्व परवानग्या मिळविणेकामी, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून अथवा मान्यता प्राप्त कंपनीकडून. शासनाचे पाणी खाते, महानगपालिका व त्यांची सर्व कार्यालये इतर सर्व अधिकारी या सर्वांकडे अर्ज करणे, जाबजबाब देणे आवश्यक ती कागदपत्रे, लेख तयार करून सादर करणे, व उपरोक्त परवानग्या मिळवून विज पुरवठा, पाणी पुरवठा चालू करून घेणेसाठी सर्व फी व चार्जेस भरणे, इलेक्ट्रिक मीटर बसवून देणे, तसेच स्थानिका स्वराज्य संस्थेकडून शासनाकडून अथवा निम शासकीय खात्याकडून अथवा संस्थेकडून जरूर त्या सर्व परवानग्या मिळवून नळाचे कनेक्शन घेऊन इमारतीस पाणी पुरवठा करणे.

२५. महाराष्ट्र विदयुत मंडळाचे अधिकारी यांचेशी सदर मिळकतीत बांधल्या जाणाऱ्या इमारतींसाठी विजेचे कनेक्शन घेणेसाठी किंवा विदयुत सब स्टेशन प्रस्थापित करण्यासाठी आमचे वतीने पत्रव्यवहार करणे, विचार विनीमय करणे, आणि त्या प्रयोजनासाठी आमचे कुळमुखत्यारी ठरवतील त्याप्रमाणे किंवा वीज मंडळाचे अधिकारी यांचे निर्देशानुसार आवश्यकता असलेल्या सर्व अर्ज/हमीपत्र/पत्र व अटी व शर्ती व करारमदारांवर सह्या करणे.

२६. सदरची मिळकत कोणत्याही बँकेकडे, संस्थेकडे, शासनाकडे, गहाण, ठेवून चार्ज, लीज. हक्क, निर्माण करून भांडवल निर्माण करणे व सदरचे भांडवलाची

D.B.Patil

रक्कम मिळकत विकसित करण्यासाठी वापरणे व आपणांस योग्य वाटेल त्याप्रमाणे त्या रक्कमेची विल्हेवाट लावणे, त्याकामी योग्य ते करार, दस्त, लिखाण, व इतर कायदेशिर बाबींची पूतता करणे, तसेच सदर करार, दस्त, लिखाण, व जरूर त्या अधिका-यांकडे हजर करून देणे व आमचे वतीने सह्या करणे.

२७. सदरची मिळकत स्वतः विकसित करणे, अथवा योग्य वाटेल त्या इसमास संस्थेस दुस-या इसमास विससित करण्यास देणे, सदरची जमीन विकि करणे, गहाण ठेवणे, या कामासाठी तुम्हास योग्य वाटेल तो मुखतारी नमणे व आम्ही मालक म्हणून दिलेले सर्व अधिकार सदर इसमांस देणे, त्यामधून मिळणारी भरपाई रक्कम अगर संपूर्ण रक्कम स्विकारणे व जरूर त्या पावत्या देणे. सदरहु मिळकत असाप्रकारे विकी व्यवहारा करतेवेळीस मुळ मालकाच्या वेगळया परवानगीची गरज लागणार नाही, या बाबत सर्व दस्त करून देणे, सदर दस्तांवर आमचे तर्फ आमचे कुळमुखत्यारी म्हणून कायम निबंधक ह्यांचे समोर राहून दस्ताची पूतता करून देणे व नोंदणी कायद्याप्रमाणे नोंदणी करणेचे अधिकार आम्ही आमचे कुळमुखत्यारी हयांस दिले आहेत.

२८. सदर जमिनीबाबत आमच्या नावे कोण्त्याही फौजदारी अथवा दिवाणी कोर्टा कडून अथवा महसूल खात्याकडून स्थानिक संस्थेकडून येणारे समन्स अथवा नोटीसा स्विकारणे सदर समन्स अथवा नोटीसांची पावती देणे, व त्याप्रमाणे जरूर त्या कोर्टा मध्ये अथवा अधिका-यांसमोर आमचे वतीने हजर राहणे, सदर दाव्याचे कामी कोर्टात हजर राहून कामकाज पाहणे, तसेच कामकाज पाहण्यासाठी जरूर तो वकिल नेमणे, वकिलपत्रावर आमचे कुळमुखत्यारी म्हणून सही करणे, सदर दाव्याकामी कौफियत करणे, कैफियतीवर आमचे वतीने सह्या करणे, साक्षीदार हजर करणे, कागदपत्रे दाखल करणे.

२९. सदर मिळकतीचे संबंधाने आवश्यक ते सर्व प्रकारचे दावे कैफियती अपिले रिव्हीजन अर्ज वगैरे सर्व प्रकारचे दिवाणी रेव्हेन्यू अथवा फौजदारी दावे व खटले कोर्टात, महसूल खात्यांकडे, शासनाकडे अथवा निम शासकीय खात्याकडे अर्ज, दावे, दाखल करणे, सदर अर्ज, दावे, अपिल, इत्यादी कागदपत्रांवर सही करणे, जाबजबाब

D. B. Pete

देणे, कैफियती, प्रतिज्ञापत्रे, वगैरे सह्या करणे, साक्षीपुरावा, जाबजबाब देणे, आवश्यकती कागदपत्रे दाखल करणे, जजमेंट, हुकूमनामा, वगैरेंच्या सही शिक्यांच्या नकला मिळण्यासाठी म्हणून अर्ज दाखल करणे, तसेच सदर दाव्याकामी अपिलाकामी दिलेल्या निर्णयाविरूध्द वरिष्ठ कोर्टात अपिल दाखल करणे, निकाल कबूल करणे, अथवा समझोता करणे, एकंदर सदर मिळकतीसंदर्भात व मिळकतीचे डेव्हलपमेंट संदर्भात आवश्यक ती कोर्ट कारवाई करणे.

३०. आमचे वतीने व आमचे नावे कोणत्याही दिवाणी कोर्टात उच्च न्यायालयात किंवा अन्य सक्षम अधिका-यांकडे किंवा न्यायालयात दावे लावणे, दाखल दाव्यात प्रतिवादी होणे, विनंती अर्ज करणे, योग्य ते कामकाज चालविणे, वकिलांची नेमणूक करणे, व त्याप्रयोजनासाठी प्लेंट व विनंती अर्जावर सही करणे, प्रतिज्ञापत्र सादर करणे, जाबजबाब देणे, साक्षीपुराव्यांवर सह्या करणे, तसेच कोर्ट कचेरीकामी तडजोड करणे, आणि यासंबंधात आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी करणे.

३१. वरील सर्व कामे करण्यासाठी वकिल, वास्तुविशारद, आर.सी.सी. कंस्लटंट व अन्य व्यावसाईक यांची नेमणूक करणे, अथवा नियुक्त केलेल्या वकिल, वास्तुविशारद, आर.सी.सी. कंस्लटंट व अन्य व्यावसाईकास बदलणे अथवा काढून टाकणे व त्यांना सर्व प्रकारची माहीती व कागदपत्रे देणे.

३२. सदरहू मिळकतीवर काही भाडेकरू, पोटभाडेकरू, कुळवहिवाटदार, लागवड करणारे उपभोक्ते, अतिकमण करणारे सर्व इसम, तसेच मिळकतीवर किंवा त्यावरील मोकळया जागा वा स्ट्रक्चर्स् वा निवासी जागेवर दुरान्वये हक्क, अधिकार किंवा हितसंबंध सांगणारे कोणीही इसम यांचेविरूध्द जागेचा खुला ताबा मागणारी नोटीस देणे, कायदेशिर कारवाई करणे, अतिकमण दुर करणे, सर्व प्रकारची कायदेशिर उपाययोजना करणे, सदर मिळकतीवरील कोणत्याही जागेमध्ये तपासणी करण्यासाठी किंवा दुरूस्ती करण्यासाठी योग्य वेळी प्रवेश करण्याच्या आमच्या अधिकारांचा वापर करणे, भाडेकरू/पोटभाडेकरू/उपभोक्ते यांचेशी समझोता करणे, त्यांचेवर कोर्टात

* D.B. Pulte

By

दावे लावणे व त्यासाठी दावा/केफियत/प्रतिज्ञापत्र/अंतरिम अर्ज यांचेवर सह्या करणे, तडजोड करणे किंवा त्यांचेशी सदर मिळकती संदर्भात करारमदार करणे.

३३. सदर मिळकतीचे विकासाचे कामी सिमेंट, पोलाद किंवा अन्य इतर बांधकाम साहित्य मंजूर करून घेणेसाठी शासकीय किंवा निम शासकीय अधिका-यांकडे अर्ज करणे व त्या प्रयोजनासाठी आवश्यकतेनुसार हमीपत्र, बॉड, किंवा अन्य दस्त करून देणे व अनामत रक्कम भरणे. सदर मिळकतीचा विकास पुर्ण होईपर्यंत मिळकतीची देखभाल करणे व तिचे सुयोग्य व्यपस्थापनासाठी योग्यती पाऊले उचलणे.

३४. सदरहू मिळकतीवर अथवा मिळकतीचे भागावर बांधल्या जाणा-या ब्लॉक्सधारकांसाठी अथवा प्लॉटधारकांसाठी सोसायटी संस्था कंपनीचे लाभांत आमचे वतीने खरेदीखत करून देणे, सदरचे खरेदिखत दुय्यम निबंधक ह्यांचे कार्यालयात दाखल करणे, खरेदीखतांवर अथवा मिळकतीबाबत केल्या जाणा-या सर्व दस्तऐवजांवर आमचे वतीने सह्या करणे, सदरची मिळकत सोसायटीचे नांवे अथवा आम्हास योग्य वाटेल, त्या कंपनीच्या नावे करून देणे, सदर मिळकत अथवा तिचे भागांवर बांधल्या जाणा-या इमारतीतील गाळे, ब्लॉक्स, इमारत विकणे व त्यामधून मिळणारी रक्कम स्विकारणे.

३५. सदरहू मिळकत विकसित करण्यासाठी बॅंकेकडून अथवा इतर कोणत्याही संस्थेकडून आर्थिक सहाय्य मिळविण्याचे असल्यास ते सदरहू मिळकत वा मिळकतीचा कुठलाही भाग वा तुकडा ही गहाण ठेऊ शकतात, त्यासाठी ह्या दस्ताद्वारे दुसरे पक्षीय हे पहिले पक्षीय यांना संबंधीत कागदपत्रांवर दुसरे पक्षीय यांचे वतीने सह्या करण्याचे तसेच ते जरूरी लागल्यास रजिस्ट्रार साहेब यांचे कार्यालयात नोंदविण्याचे सर्व हक्क दिले आहेत तसेच दुसरे पक्षीय यांचे वतीने मूळ कागदपत्र सदर संस्थेकडे बॅंकेकडे स्वाधिन करण्याचे अधिकार आमचे कुळमुखत्यारी ह्यांस दिले आहेत.

३६. तलाठी, तहसिलदार, कलेक्टर, महाराष्ट्र शासन, महानगरपालिका व अन्य पब्लिक ॲथॉरिटी, यांचे दप्तरी सदर मिळकतीचे हस्तांतरणासाठी व ७/१२ उताारे व

D. B. Patil

अन्य रेव्हेन्यु रेकॉर्डसमधून आमची नावे काढून त्यात कबूली जबाब देणे वगैरे संबधीत नोंद करण्यासाठी आवश्यक असलेले ट्रान्सफर फॉर्मवर स्वाक्षरी करणे.

३७. मा. जिल्हाधिकारी यांचेकडून पूर्ण क्षेत्राचे ७/१२ वरून माझ्या वतीने ले आऊट मंजूर करून घेणे तसेच भूमी अभिलेख ठाणे यांचेकडून मोजणी करून हद्द कायम करून घेणे.

३८. या लेखाद्वारे दिलेल्या अधिकारांचा वापर करत असताना आमचे कुळमुखत्यारी यांना आलेले सर्व प्रकारचे खर्च किंवा कोणतेही काम वा कृती वा गोष्टी केल्यामुळे, करवून घेतल्यामुळे होणारा तदनुषंगिक खर्च आमचे कुळमुखत्यारी यांनीच सोसावयाचा आहे व त्याची तोषिस आम्हाला लागणार नाही.

३९. सदरची मिळकत आमचे मालकीची व हक्काची बोजा विरहित अशी विकावू मिळकत असल्याचे मालक म्हणून या मिळकतीबाबत आम्हांला जे जे अधिकार आहेत ते ते सर्व अधिकार आम्ही तुम्हास या कुळमुखत्यारपत्रान्वये देत आहोत. त्या मुखत्यारपत्राच्या आधारे तुम्ही स्वतः किंवा तुम्ही नेमलेल्या कोणत्याही मुखत्यारी जी जी कामे कराल व ती ती सर्व दस्त कामे करारामदार वगैरे सर्व आम्ही केल्याप्रमाणे आम्हांस मान्य व कबूल राहतील. तसेच सदरचे दस्तऐवज आमचेवर व आमचे वालीवारस यांचेवर बंधनकारक राहील व या सर्व गोष्टींचे सत्यतेसाठी आम्ही आज रोजी तुम्हांस हे कधीही रद्द न होणारे कुळमुखत्यारपत्र लिहुन देत आहोत. सदरचे कुळमुखत्यारपत्र कधीही रद्द न होणारा मुखत्यारपत्र असून कुळमुखत्यारपत्र करून देणा-या आमचेपैकी कोणचाही मृत्यू झाल्यास किंवा कोणी असमर्थ ठरल्यास सदरहू कुळमुखत्यारपत्र रद्द करता येणार नाही व असे घडल्यास अशा मयत किंवा असमर्थ व्यक्तीच्या वारसांकडून अतिरिक्त कुळमुखत्यारपत्र करवून घेण्याची जबाबदारी दुसरे पक्षीययांची राहील.

४०. हा कुळमुखत्यारपत्र यातील हक्क व जबाबदा-यांसह उभयपक्षीय व त्यांचे वालीवारस तसेच पहिले पक्षीय यांचे नॉमिनीज व असायनीज यांजवर बंधनकारक

D.B. patil

Hemant

राहील. या करारतील 'दुसरे पक्षीय' या सज्ञेत दुसरे पक्षीय हे स्वतः, त्यांचे वालीवारस, मृत्युपत्र चालविणारे इसम व त्यांचे नॉमिनी, असायनी व प्रतिनिधी यांचा समावेश असून 'पहिले पक्षीय' या सज्ञेत त्या त्या वेळी असणारे पहिले पक्षीय फर्मचे भागीदार, त्यांचे वालीवारस त्यांचे वालीवारस, मृत्युपत्र चालविणारे इसम व त्यांचे नॉमिनी, असायनी व प्रतिनिधी यांचा समावेश आहे.

४१. सदर दिनांक 25/8/0६ चा विकासनाचा करार योग्य त्या स्टॅम्पावर लिहीलेला आहे व तो मे.दुय्यम निबंधक , ठाणे यांचे कार्यालयात कमांक 2339/0६ वर नोंदविलेला आहे. सदर कुळमुखत्यारपत्र हे सदर योग्य मुद्रांक लावलेल्या व नोंदलेल्या वरील करारांचे तरतुदीनुसार दिलेले असल्यामुळे मुंबई मुद्रांक कायदा, १९५८ चे कलम (४) चे तसेच सदर कायदयाचे परिशिष्ठ १ (४८) (जी) चे तरतुदींनुसार सदर मुखत्यारपत्र लिहीलेले आहे.

येणेप्रमाणे आज दिनांक 25 माहे एप्रिल सन 2006 रोजी ठाणे येथे सदर कधीही रद्द न होणारे कुळमुखत्यारपत्र लिहुन दिले.

साक्षीदार

१.

२.



D.B.Patil

१. श्री. धर्मा बारक्या पाटील

Mrs D.Patil


२. श्री. माणिक धर्मा पाटील



३. श्रीमती यशोधा माणिक पाटील



४. श्री. भानुदास माणिक पाटील





५ . श्री . दिनेश माणिक पाटील

६ . सौ . अंजली सुरेश पाटील




७ . सौ . हेमा सुनिल पाटील

८ . सौ . जया राम भगत



९ . श्री . तुलसिराम धर्मा पाटील
स्वताःसाठी व कुमारी किर्ती तुलसिराम
पाटील आणि कुमार निखिल तुलसिराम
पाटील तर्फे अपा . म्हणून



१० . श्रीमती जयवंती तुलसिराम पाटील



११ . श्री . अर्जुन धर्मा पाटील
स्वताःसाठी व कुमार भावेश अर्जुन
पाटील तर्फे अपा . म्हणून

१२ . श्रीमती वनीता अर्जुन पाटील





१३ ~~श्रीमती चंद्राबाई रामवंश पाटील~~



१४ . श्रीमती कुसूम बाळाराम पाटील

१५ . ~~श्रीमती यमुनाबाई मोतीराम पाटील~~



१६ . सदानंद मोतीराम पाटील
स्वताःसाठी व कुमारी तृप्ती सदानंद
पाटील अपा . म्हणून



१७ . श्रीमती रजनी सदानंद पाटील





१८ . श्री . प्रकाश मोतीराम पाटील
स्वताःसाठी व कुमारी साहिली प्रकाश
पाटील व कुमार आदित्य प्रकाश
पाटील तर्फे अपा . म्हणून



१९ . श्रीमती संध्या प्रकाश पाटील



२० . सौ . हर्शला नारायण म्हात्रे



२१ . श्रीमती यमुनाबाई कृष्णा पाटील

२२ . श्री . रमाकांत कृष्णा पाटील



२३. श्री. दिपक कृष्णा पाटील

२४. श्री. धर्मेंद्र कृष्णा पाटील



२५. सौ. कामिनी वसंत म्हात्रे

२६. ~~श्रीमती यशवंती प्रभाकर पाटील~~



२७. श्री. भागेश प्रभाकर पाटील

२८. श्री. संतोष प्रभाकर पाटील



२९. श्री. हेमंत प्रभाकर पाटील

३०. सौ. आशा लालचंद भाईर



३१. सौ. शकुंतला गजानन पाटील



३३ . सौ . भारती वसंत पाटील
कुळमुखत्यारपत्र लिहून देणार

वरील कुळमुखत्यारपत्र आम्ही स्विकारले
मेसर्स दोस्ती एन्टरप्रायझेस, भागीदारी संस्था
तर्फे भागीदार

१ . श्री . दिपक के . गोराडीया



२ . श्री . राजुल वी वोरा



३ . मेसर्स दोस्ती लॅण्ड डेव्हलपर्स् प्रायव्हेट लि.
कुळमुखत्यारपत्र लिहून घेणार

कुळमुखत्यारपत्र लिहुन देणार व लिहुन घेणार
यांस मी ओळखतो .

(वकील)

D. B. Patil

M. D. Patil

H. S. Patil

J. R. Bhayat

जयवंती कुलशिराम पाटील

R. S. Patil

R. K. Patil

D. V. Patil

K. V. Motre













दु.नि.पा.

B.V. Patil

दु.नि.पा.

क्र. ३८८/०६

दुय्यम निबंधक ठाणे क्र. २

सदर मुखत्यार पत्र आज दि. २५/१०/०६ रोजी.

१) डॉ धर्मा द्वारकया पाटील २) माणिक धर्मा पाटील

३) यशोदा माणिक पाटील ४) भानुदास माणिक पाटील

५) दिनेश माणिक पाटील ६) अंजली सुरेश पाटील

७) हेमा सुनेल पाटील ८) जगा राम भगत

९) जयवंती पुरुषोत्तम पाटील १०) अर्जुन धर्मा पाटील हे.
हे किसी व निखील यांचे अ.पा.क एक आदेश साठी अ.पा.क

११) वनिता अर्जुन पाटील १२) कुसुम बाळाराम पाटील

१३) सदानंद मोतीराम पाटील १४) रजनी सदानंद पाटील
हे वारली कारिता अ.पा.क

१५) संध्या प्रकाश पाटील हे सोनिमी व आदित्य यांचे अ.पा.क

१६) हर्षदा नारायण म्हात्रे १७) यमुनाबाई कृष्णा पाटील

१८) रमाकांत कृष्णा पाटील १९) दिपक कृष्णा पाटील

२०) धर्मेंद्र कृष्णा पाटील २१) कामिनी वसंत म्हात्रे

२२) भगेश प्रभाकर पाटील २३) संतोष प्रभाकर पाटील

२४) श्री हेमंत प्रभाकर पाटील २५) आशा भालचंद्र भोईर

२६) शकुंतला गजानन पाटील २७) भारती वसंत पाटील
सर्व सज्ञान रा. ठाणे

२८) मे. दोस्ती अँड अँड डेव्हलपर्स तर्फे दिपक गायकवाड
यांचे कु.मु. डॉ. श्रीपाद शिरवळकर सज्ञान रा. ठाणे
यांनी माझ्या समक्ष सही करुन दिला

दुय्यम निबंधक/ठाणे क्र. २

ओळख देणारे - १) श्री विनायक पोचाप
सह्या वा. गीता झेरेकर
ठाणे

२) श्री सुधीर काळके
सह्या वा ठाणे

दुय्यम निबंधक ठाणे क्र. २

टिप:- सदर मुखत्यारपत्रामध्ये पान नं 2 व 2 वर खाडाखोड आहे

दुय्यम निबंधक ठाणे क्र. २

SEAL OF THE SUB-REGISTRAR
ठाणे - १
THANE - 2